६ लोकसत्ता मुंबई, शुक्रवार, २ जानेवारी २००९

# कुतूहल

## खगोल वर्ष

संयुक्त राष्ट्रसंघाने २००९ साल हे खगोल विज्ञानाला समर्पित वर्ष म्हणून घोषित केले आहे. जनमानसात खगोलशास्त्राबद्दल रुची उत्पन्न करावी, वाढवावी याकरिता सर्व देशांत विविध मार्गांनी प्रयत्न केले जाणार आहेत. व्याख्याने, रेडिओ-टीव्हीवर कार्यक्रम, प्रदर्शने, तारांगणातील खास शो, पुस्तके आणि लेख यांच्या माध्यमांचा यासाठी वापर होईल. पण या सर्व उपद्व्यापासाठी २००९ साल का निवडण्यात आले? त्यामागचा इतिहास थोडक्यात असा... चारशे वर्षांपूर्वी -म्हणजे १६०९ साली- गॅलिलिओने एक असा शोध लावला, ज्यामुळे खगोलशास्त्रात एक क्रांती झाली. काही महिन्यांपूर्वी दुर्बिणीचा शोध लागला होता आणि पृथ्वितलावर त्याचा उपयोग किती महत्त्वाचा आहे ते दिसून येत होते. एखाद्या सैन्याच्या सेनापतीला दूरस्थ शत्रूच्या गोटातल्या 'गुप्त' हालचाली दुर्बिणीतून पाहता येत. डोंगराळ भागात वाट चुकलेल्या वाटसरूला मार्गी लावायला दुर्बीण मदत करे, तर याच न्यायाने दूरच्या गोष्टी जवळ आणू पाहणारी दुर्बीण आकाशस्थ पिंडांचे स्पष्ट दर्शन घडवून आणेल का?

विज्ञानं जनहिताय

मराठी विज्ञान परिषद



आंतरराष्ट्रीय खगोल वर्ष २००९

गॅलिलिओसारख्या इटलीतील भौतिक शास्त्रज्ञाला प्रयोग करायची हौस होती. त्याने सामान्य दुर्बिणीत काही बदल करून तिचे तोंड आकाशाकडे वळवले, तेव्हा १६०९ साल उजाडले होते. दुर्बिणीतून दिसणारे विश्व पाहून गॅलिलिओ चकित झाला. साध्या डोळ्यांनी गुळगुळीत पृष्ठभागाचा वाटणारा चंद्र उंचसखल-डोंगर व विवरे यांनी व्याप्त दिसत होता, तसेच सूर्याच्या प्रकाशित पृष्ठभागावर त्याला चक्क काळे डाग दिसले आणि एक -असाच अनपेक्षित शोध- दुर्बिणीने लावला तो म्हणजे गुरू ग्रहाभोवती फिरणाऱ्या चंद्रांचा! दुर्बिणीच्या या वापराने जनमानसात संभ्रम निर्माण झाला. त्यातून दिसते ते खरोखर तसे असते का? देवाने सृष्टीची निर्मिती निर्दोष स्वरूपात केली असताना चंद्राचा चेहरा 'खप्पड' कसा आणि सूर्यावर डाग कसे? आणि सर्व विश्व पृथ्वीभोवती फिरते असे मानणाऱ्या समाजाला गुरूभोवती चार चंद्र फिरतात हे कसे पटावे? त्यामुळे तत्कालीन समाजधुरीणांनी आणि धर्ममार्तंडांनी दुर्बिणीतून दिसणारे वास्तव नसून मायाजाल आहे, असा फतवा काढला. पण वैज्ञानिक सत्य अखेर मान्य करावेच लागते. गॅलिलिओची दुर्बीण विश्वाच्या वेधांची आजची उपकरणे पाहता लहानशी वाटते, पण ४०० वर्षांपूर्वी तिने केलेले मार्गदर्शन अमोल होते.

**■ जयंत नारळीकर**

मराठी विज्ञान परिषद, विज्ञान भवन, वि. ना. पुरव मार्ग, शीव-चुनाभट्टी (पूर्व), मुंबई ४०००२२
दूरध्वनी - (०२२)२४०५४७१४, २४०५७२६८ १.१.०९